# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

**ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,**

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ **कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५** ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६/०२/२०२१**

## जिल्हा : जळगाव

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२६/०२/२०२१ ते ०२/०३/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 27 | 28 | 1 | 2 | 3 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 37 | 36 | 37 | 37 | 36 |
| किमान तापमान (अं.से.) | 18 | 19 | 20 | 19 | 18 |
| ढग स्थिती (आकाश) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 28 | 33 | 30 | 26 | 13 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 13 | 14 | 13 | 11 | 9 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 9 | 7 | 8 | 9 | 9 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 303 | 311 | 304 | 57 | 77 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ ते ०२ मार्च, २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पक्व झालेली रब्बी पिकांची काढणी करुन घ्यावी. काढणी झालेल्या पिकांची मळणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी.<br>• कोरडे हवामान लक्षात घेता रब्बी पिके , भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, जमिनीची खोली/ जमिनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल अॅपचा वापर करावा. |
| हरभरा | काढणी अवस्था | हरभरा पिक ओलसर असताना काढणी करू नये. घाटे कडक वळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी. यानंतर धान्यास ६ ते ७ दिवस चांगले उन्हात वाळवून कोठीत साठवावे. धान्यात कडूनिंबाचा पाला ५ टक्के मिसळावा. साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| तुर | पक्वता ते काढणी अवस्था | तूरीच्या शेंगा वाळल्यावर पीक कापून घ्यावे व खळ्यावर मळणी करावी. तूर पिकाचा खोडवा घेऊ नये कारण वांझ या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. साठवणीपुर्वी तूर धान्य ५ ते ६ दिवस चांगले उन्हात वाळवून पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. धान्यात कडूनिंबाचा पाला ५ टक्के मिसळावा. |

| | | |
|---|---|---|
| मका | कणसे भरणे ते पक्वता अवस्था | मक्यावरील लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी ५ % निबोंळी अर्क किंवा लॅमडा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी या मिश्र किटकनाशकाची ५ मिली प्रति १० लिटर पाणी फवारावे. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी १५ ते २० दिवसापर्यंत करु नये. |
| गहू | पिक वाढीची अवस्था | गहू पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली किंवा इमीडयाक्लोप्रीड १७.८ एस.एल. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी म्यान्कॉझेब हे बुरशीनाशक १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| कांदा | पीक वाढीची अवस्था | कांदा पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५; २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कांदा पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १५ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ % प्रवाही ६ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| टोमॅटो | | टोमॅटो पिकांवर फुलकिडे व पांढरी माशीचा प्रादुर्भाव तसेच स्पॉटेड विल्ट व्हायरस व लिफ कर्ल या विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी सायन्ट्रॅनिलीप्रोल १०.२६ टक्के ओडी १८ मिली व त्यानंतर डायमेथोएट ३० टक्के ईसी २० मिली प्रति १० लीटर पाण्यातून फवारावे. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी मेन्कोझेब ७५ टक्के डब्ल्यु जी २० ग्रॅम किवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. फळ पोखरणा-या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास इंडोक्झाकार्ब १४.५ टक्केन एस.सी. १० मिली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ईसी २० मिली प्रति १० लीटर पाण्यातून फकारावे. |
| कोबीवर्गीय पिके | पिक वाढीची अवस्था | कोबी पिकावरील मावा व फुलकोबीतील गड्डा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी म्यलेथिओन ५० ई. सी. २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे किंवा ४ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| कलिंगड/ खरबूज | पिक वाढीची अवस्था | नाग अळीच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफोस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. तसेच फळ माशीच्या नियंत्रणासाठी क्यू लुरचे एकरी ५ सापळे लावावेत. |
| आंबा | मोहोर | आंब्यावर तुडतुडयांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे.<br>केशर आंब्यामध्ये उभयलिंगी फुलांचे प्रमाण, फुलधारणा आणि उत्पादन वाढविण्यासाठी १ % पोटॅशिअम डायहायड्रोजन फॉस्फेट (१०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात) मोहर फुटण्याच्या वेळी आणि त्यानंतर १ महिन्याने १ % पोटॅशिअम नायट्रेटची (१०० ग्रॅम प्रति १० लीटर पाण्यात) फवारणी करावी. तसेच गावठी व अनुत्पादित आंब्यांच्या झाडाचे सुधारित जातीत रुपांतर करण्यासाठी नविन फुटव्यावंर फेब्रुवारी, मार्च महिन्यात केसर वाणांचे कलम करावे. |
| केळी | | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गर्जेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सहयायाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. केळी पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी केळीचे घड ६ टक्के सच्छीद्रतेच्या पॉलीथीन पिशव्यांनी झाकावेत. मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट २० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | उन्हाळी हंगामात जनावराना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी किंवा बाजरी किंवा मका या चारा पिकांची लागवड करावी. शेळ्याकरिता लिव्हर फ्लूक (चपटे कृमी) जंताच्या नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या साह्यानेजंतनाशक पाजावे. जनावरांना नेहमी स्वच्छ पाणी पिण्यास द्यावे. उसाचे वाढे जनावरांना जास्त प्रमाणात खाऊ घालू नये. खाऊ घालावयाचे असल्यास प्रति दिन एका जनावरास केवळ ८ किलो वाढे आणि त्यासोबत सकस द्विदल वर्गातील हिरवा चारा, |

| | | |
|---|---|---|
| | | गरजेनुसार वाळलेला चारा व आंबवण तसेच २५ ते ३० ग्रम क्षार मिश्रण देणे अत्यंत गरजेचे आहे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : २६.०२.२०२१

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**